म्हाडा MHADA

**छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर**
**(म्हाडाचा विभागीय घटक)**

# अनिवासी भुखंडाचा ई-लिलाव -जुन-२०२५

**छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ आणि म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील तरतुदींनुसार विविध योजनांतर्गत ५३ अनिवासी भुखंडासाठी ई-लिलाव जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

**अर्जदारांना नोंदणीसाठी, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी व निकालाबाबतचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी म्हाडाच्या संकेत स्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे इत्यादीकरीता सुरुवात दिनांक व वेळ | दि.०२/०६/२०२५ दुपारी १२.०० वाजेपासून |
| २ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी म्हाडाच्या संकेत स्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे इत्यादीकरीता अंतिम दिनांक व वेळ | दि.०१/०७/२०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| ३ | ई-लिलावाकरिता RTGS/NEFT व्दारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | दि.०२/०७/२०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ४ | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) सुरु होण्याची दिनांक व वेळ | दि.०७/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून |
| ५ | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) करीता अंतिम दिनांक व वेळ | दि.०७/०७/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत |
| ६ | ई-लिलावचा एकत्रित निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि.०८/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता |

ऑनलाईन अर्जाची किंमत तसेच ई-लिलाव प्रक्रिया शुल्क रु.६०००/- + रु.१०८० (१८% जीएसटी) = **रु.७,०८०/-** (विनापरतावा)

सर्व अनिवासी भुखंडासाठी अर्ज शुल्क व्यतिरिक्त प्रत्येकी अर्जनिहाय अनामत रक्कम **रु.५०,०००/-** चा वेगळा भरणा करावा लागेल.

विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक भुखंडाचे विस्तृत विवरण (मराठी व इंग्रजी भाषा), भुखंडाचे वापराबाबतचे आरक्षण व अर्ज करण्याची कार्यपध्दती, तसेच म्हाडा कायदयानुसार असलेल्या ई-लिलाव संबंधित सविस्तर अटी व शर्ती तसेच ऑनलाईन अर्ज सुचना माहितीपुस्तिका,जाहिरात इत्यादी सर्व माहिती **eauction.mhada.gov.in** व **www.mhada.gov.in** या संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction portal वर दि.०१/०६/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उपलब्ध होईल. अर्जदाराने संकेत स्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच अर्ज सादर करावा. अर्जदारास छपाईबाबतच्या कोणत्याही चुकीचा फायदा घेता येणार नाही. जाहिरातीतील कोणत्याही चुकीच्या दुरुस्तीबाबतचे तसेच ई-लिलाव संबंधित सर्व अधिकार मुख्य अधिकारी/छ.सं.मं. यांनी राखून ठेवलेले आहेत.

स्वाक्षरीत
**(शिवकुमार आवळकंठे)**
मुख्य अधिकारी
छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
छत्रपती संभाजीनगर